## रेग्यु. दिवाणी मुकदमा नं. ५४/२०१७ मधील नि. १० आदेश

CNR No.: MHSI05-000289-2017

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादीतर्फे त्याचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द बातल करण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादीच्या मते वेळीच कागदपत्र प्राप्त न झाल्यामुळे आणि प्रतिवादीच्या मुलीचा विवाह संपन्न झाल्याने प्रतिवादी त्या कार्यामध्ये व्यस्त राहिल्याने आपल्या वकिलांना भेटून आवश्यक ती माहिती मुदतीमध्ये देता आली नाही. सबब प्रतिवादीला जर त्याची कैफियत मांडण्यापासुन वंचीत ठेवले तर त्याच्यावर अन्याय होणार असून त्याचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्याचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द बातल करावा अशी मागणी त्याने केली आहे.

२. या अर्जास वादीतर्फे निशाण ११ वर म्हणणे सादर करण्यात आलेले असून त्याने प्रतिवादीच्या अर्जाचे खंडण केले आहे. त्याच्या मते प्रतिवादीला कोणती कागदपत्रे मिळाली नाही आणि प्रतिवादीच्या मुलीचा लग्न केव्हा झाला व कसा विलंब झाला या गोष्टीबाबत खुलासा करण्यात आलेला नाही. सबब या मागे प्रतिवादीचा केवळ निष्काळजीपणा आहे. प्रतिवादीला वेळोवेळी त्याने कैफियत सादर केली नाही याची जाणीव करुन देण्यात आली होती. तसेच कैफियत देण्यासाठी देखील ब—याच मुदती देण्यात आल्या होत्या. सबब प्रतिवादीचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अशी मागणी त्याने केली आहे.

३. एकंदरीत परिस्थितीमध्ये प्रस्तुतचा दाव्यामध्ये वादीची कैफियत येणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार केला असता प्रतिवादीला संधी दयायला हवी. मात्र प्रतिवादी विरुध्द विना कैफियत आदेश दिनांक २/३/२०१८ रोजी करण्यात आला होता. प्रतिवादीला पुरेसा कालावधी दिला होता. त्यामुळे या कालावधीमध्ये दाव्यातील बराचसा वेळ वाया गेलेला आहे. या परिस्थितीमध्ये नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रतिवादीला संधी देणे मला उचित वाटते. मात्र त्यावेळेस वादीला त्याने दंड देखील दयायला हवा. सबब परिस्थितीचा साधकबाधक विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादीला ५००/—रुपये देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात

येतो. सदर रक्कम आज अगर पुढील तारखेला भरावी. रक्कम न भरल्यास प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द समजावा.

३. सबब प्रतिवादीने आदेशाची पुर्तता करावी. पुर्तता केल्यावर त्याची कैफियत कामामध्ये दाखल करुन घेण्यात येईल.

सही/—

दिनांक— १२/०७/२०१८

(वि. द. पाटील)

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.